नवीन प्रकल्प नियोजन कालावधी मध्ये "पूर्वतयारी कालावधी" आणि "परिवर्तन कालावधी" याची तरतूद करणे.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण- २०१४/(३९/१५/जसं(आस्था)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १३ सप्टेंबर, २०१७.

वाचा -

१) जलसंपदा विभाग, कार्यासन मोप्र-२ यांचे पत्र क्रमांकः संकीर्ण-२०१४/(३७१/२०१४), दि.०७/१०/२०१४.
२) शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्रमांकः संकीर्ण-२०१४/(२४८/१४)/मोप्र-२, दि.२५/०८/२०१४.

प्रस्तावना :-

राज्यातील विविध पाटबंधारे विकास महामंडळांकडील सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव, सिंचन क्षमता, सिंचित क्षेत्र यांची तपासणी करण्याकरिता डॉ. माधवराव चितळे, जलतज्ञ तथा माजी सचिव, केंद्रीय जलसंसाधन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अध्यक्षतेखाली विशेष चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीने त्यांचा अहवाल दि. १.३.२०१४ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना सादर केला असून या अहवालावर शासनातर्फे करावयाच्या कार्यवाहीचा मुद्देनिहाय कार्यपालन अहवाल दि.१४.०६.२०१४ रोजी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेला आहे. सदर समितीचे अहवालातील प्रकरण क्र.३ मधील परिच्छेद ३.२.४ प्रकल्प पूर्ण होण्यासाठी होणाऱ्या विलंबाबाबतची मोजणी तसेच प्रकरण ७ मधील ७.४.२ मध्ये प्रकल्पाच्या पूर्वतयारीसाठी वेळ निर्धारित करणे या अनुषंगाने समितीने शिफारस क्र. २१ मध्ये "प्रकल्प नियोजनामध्ये प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरु होण्यापूर्वी विविध प्रकारची कामे करावी लागतात. त्यामुळे हा कालावधी पूर्वतयारी कालावधी समजण्यात यावा. तसेच प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पांचे लाभक्षेत्र विकसित होण्यासाठी काही कालावधी लागतो. अशा कालावधीस परिवर्तन कालावधी संबोधणे" अशी शिफारस केली आहे. यामुळे प्रकल्पाचे नियोजन केवळ प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण करण्यापर्यंतच मर्यादीत न ठेवता त्याचा कालावधी प्रकल्प तयारी सुरु झाल्यापासून (पूर्वतयारी) सिंचनाचा लाभ होईपर्यंतच्या (परिवर्तन) कालावधीपर्यंत असावा. जेणेकरुन प्रकल्पाची अंतिम उद्दिष्टपूर्ती झाली अथवा नाही याबाबत अधिक

स्पष्टता येऊ शकेल. सदर समितीच्या अहवालावरील कार्यपालन अहवालात सदर सुधारणा शासनाने तत्वत: मान्य केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पाटबंधारे प्रकल्पाबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

जलसंपदा विभागामध्ये मोठे, मध्यम, लघु व उपसा सिंचन योजना इ. प्रकल्पांचे नियोजन तसेच बांधकाम केले जाते. सदरहू प्रकल्पांकरिता आकारमानानुसार बांधकामासाठी वेगवेगळा कालावधी लागतो. त्यामुळे दोन प्रकल्प एकसारखे असले, घटक कामे एक सारखी असली तरीही, प्रकल्प एकाच कालावधीत पूर्ण होतील असे नाही. त्यामुळे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी लागणाऱ्या कालावधीचे तीन भागात खालीलप्रमाणे नियोजन करण्यात यावे.

२. **<u>पूर्वतयारी कालावधी</u>** :- प्रकल्पाचे बांधकाम सुरु करण्यापूर्वी प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देणे. तद्‌नंतर आवश्यक ते सविस्तर सर्वेक्षण/अन्वेषण करणे, बांधकाम साहित्य चाचण्या घेणे,संकल्पचित्र तयार करुन आवश्यक ती तांत्रिक मान्यतेची कार्यवाही करणे, निविदा प्रक्रीया, भूसंपादनासाठी माहिती गोळा करुन प्रस्ताव तयार करणे, वन जमिन येत असल्यास आवश्यकतेनुसार प्रस्ताव तयार करणे, धरणस्थळी/बुडीत क्षेत्रातील लोकांचा भूसंपादनासाठी विरोध असल्यास प्रकल्पग्रस्तांना समजावून सांगणे, धरण संरेखेत बदल करावयाचा असल्यास मंजूऱ्या घेणे, प्रकल्पस्थळी वसाहत उभारणे अशा प्रकारची वेगवेगळी कामे करावी लागतात. प्रकल्पासाठी प्राथमिक तयारी करिता लागणाऱ्या कालावधीस “पूर्वतयारी कालावधी” असे संबोधण्यात यावे.

३. **<u>बांधकाम कालावधी</u>** :- प्रकल्पाचे प्रत्यक्ष भौतीक काम सुरु झाल्यापासून ते प्रकल्पाची संपूर्ण कामे उदा. धरणाचे बांधकाम, मुख्य कालवा व वितरण प्रणालीची कामे, त्यावरील बांधकामे संपूर्णतया पूर्ण होऊन सिंचन क्षेत्रासाठी आवश्यक वितरण प्रणाली सिंचनासाठी तयार असणे यासाठी जो कालावधी लागणार आहे त्यास “बांधकाम कालावधी” असे संबोधण्यात यावे.

४. **<u>परिवर्तन कालावधी</u>** :- प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पाचे नियोजित लाभक्षेत्र पूर्णत: विकसित होण्यासाठी लागणाऱ्या कालावधीस “परिवर्तन कालावधी” असे संबोधण्यात यावे.

५.	प्रकल्प नियोजनासाठी मोठया, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पांचे बाबतीत पूर्वतयारी कालावधी, बांधकाम कालावधी व परिवर्तन कालावधी खालील तक्त्यानुसार विचारात घ्यावेत.

अ.क्र.	प्रकल्प प्रकार	पुर्वतयारी कालावधी वर्ष	बांधकाम कालावधी वर्ष	परिवर्तन कालावधी वर्ष
१	मोठे प्रकल्प			
	अ) सिंचन क्षेत्र ५००००हेक्टर पर्यंत	५	५	३
	ब) सिंचन क्षेत्र ५०००० हेक्टरपेक्षा जास्त ते १००००० हेक्टर पर्यंत	५	७	३
	क) सिंचन क्षेत्र १००००० हेक्टर पेक्षा जास्त	५	१०	५
२	मध्यम प्रकल्प (सिंचन क्षेत्र २००० हेक्टरपेक्षा जास्त ते १०००० हेक्टर पर्यंत)	४	४	३
३	लघु प्रकल्प (सिंचन क्षेत्र २००० हेक्टर पर्यंत)	३	३	२

६.	प्रकल्पाचे नियोजन केवळ प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण करण्यापर्यंतच मर्यादीत न करता त्याचा कालावधी प्रकल्प तयारी सुरु झाल्यापासून (पूर्वतयारी) सिंचनाचा लाभ होईपर्यंतच्या (परिवर्तन) कालावधीपर्यंत करण्यात यावे. जेणेकरुन प्रकल्पाची अंतिम उद्दिष्टपूर्ती झाली अथवा नाही तसेच अंतिम उद्दिष्टपुर्तीस कोणत्या टप्प्यावर विलंब झाला याबाबत अधिक स्पष्टता येऊ शकेल.

७.	पूर्वतयारी कालावधी, बांधकाम कालावधी व परिवर्तन कालावधीसाठी प्रकल्पाचे नियोजन करताना आवश्यक आर्थिक तरतूद करण्यात यावी. तसेच विहित कालमर्यादेत उपरोक्त टप्प्याची अंमलबजावणी होत आहे याचे संनियंत्रण करणेची जबाबदारी मोठे, मध्यम व लघु प्रकल्पांचे बाबतीत अनुक्रमे मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांची राहील. सुधारित प्रशासकीय मान्यता देतेवेळी या अंमलबजावणीचा परामर्श घेण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१३१३०५४४१२७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajnish Ramkishor Shukla

Digitally signed by Rajnish Ramkishor Shukla
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d37cbfb080a0bc996a710b3c0aeea737985dac09cb66bbff878f42ad4e77a606, serialNumber=293016b5f13cd03f75c9f34c66d956309c8b3cd5faf07931d817577e6116e436, cn=Rajnish Ramkishor Shukla
Date: 2017.09.13 12:56:32 +05'30'

(र.रा.शुक्ला)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा मंत्री, जलसंपदा यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्यमंत्री, जलसंपदा यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव (जसं) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) सचिव (लाक्षेवि) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा, मंत्रालय, मुंबई.
५) सचिव (प्रकल्प समन्वय) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा, मंत्रालय, मुंबई.
६) सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग.
७) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
८) मुख्य अभियंता (जसं) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मुंबई.
९) मुख्य अभियंता (पा) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मुंबई.
१०) मुख्य अभियंता (द. व प्र.) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मुंबई.
११) उपसचिव (जसं), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) उपसचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) उपसचिव (सिंव्य), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) अवर सचिव (जसं), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) कक्ष अधिकारी (मोप्र-१/मोप्र-२), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) जसं (आस्था) कार्यासन संग्रहार्थ.